# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ

**"ज्ञानतीर्थ", विष्णुपूरी, नांदेड-431606**

***(A UGC 2(f), 12(B) recognized & NAAC Re-accredited With 'A' Grade (CGPA 3.06) State University)***


जा.क्र. तात्पुरता प्रवेश/२०१५-२०१६/८३४ दि. १०/०८/२०१५

प्रति,
मा.प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालय,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय:- तात्पुरता प्रवेश देणे बाबत.

महोदय,

वरील विषयी आपणांस कळविण्यांत येते की, उन्हाळी २०१५ मध्ये संपन्न झालेल्या पदवी व पदव्युत्तर प्रथम वर्षाच्या काही विद्यार्थ्यांचे तांत्रिक अडचणीमुळे निकाल जाहिर झालेले नाहीत व ते लवकर जाहीर करण्यांची कार्यवाही परीक्षा विभागामार्फत चालू आहे. त्या सर्व विद्यार्थ्यांना व्दितीय वर्षासाठी तात्पुरता प्रवेश त्या सर्व विद्यार्थ्यांना दयावेत. पदवीच्या तात्पुरत्या प्रवेशासाठी रू. ३००/- शुल्क आकारावे व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी रू. ६००/- शुल्क आकारावे तथापी मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शासन निर्णयांच्या तरतुदी चे पालन करून तात्पुरते प्रवेश देण्यांत यावेत. तसेच कोणताही विद्यार्थी तात्पुरत्या प्रवेशापासून वंचित राहणार नाही त्यासाठी योग्य ती काळजी घ्यावी.

तसेच सर्व प्राचार्यांना विंनती करण्यात येते की, ज्या विद्यार्थ्यांच्या गुणपत्रीकेत त्रुटी आहेत असे विद्यार्थ्यांचे म्हणे असल्यास अशा विद्यार्थ्यांच्या गुणपत्रीकेच्या झेरॉक्सची छांयाप्रत व त्या छायांप्रतीच्या पाठीमागे थोडक्यात म्हणणे नमुद करून त्या सर्व गुणपत्रीका एकत्रितरित्या महाविद्यालयांच्या कर्मचा-यांच्या हस्ते परीक्षा विभागास सादर करावयात.

आपला विश्वासू,
**स्वा/-**
संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

प्रत:- १. परीक्षा नियंत्रक, प्रस्तुत विद्यापीठ यांना माहिती व कार्यवाहीस्तव.
२. श्री. ए.ए. दर्शनकार, सिस्टीम एक्सपर्ट, यु.जी.सी. संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना सदर प्रत देवून कळविण्यात येते की, News/Circulars-BCUD अंतर्गत Circular Regarding Provisional admission & fees या शिर्षकाखाली प्रसिध्द करण्यात यावी.